आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२६ मे २०२४ - रविवार

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अखेरच्या टप्प्यासाठी प्रचारांनं वेग घेतला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज उत्तर प्रदेशात मीरजापूर इथं प्रचारसभा घेतली. यानंतर ते घुसी आणि बाजगाव इथंही प्रचारसभेला संबोधित करणार आहेत. केंद्रीय मंत्री अमित शाह बिहार आणि पंजाबमध्ये प्रचारसभा घेणार आहेत.

काँग्रेसचे नेते राहूल गांधी आज हिमाचल प्रदेशमध्ये नाहन आणि उना इथं, तर समाजवादी पार्टीचे प्रमुख अखिलेश यादव उत्तर प्रदेशात बलिया आणि सलेमपूर इथं प्रचार करणार आहेत. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल पंजाबमध्ये, राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव बिहारमध्ये चार ठिकाणी प्रचारसभा घेत आहेत.

अखेरच्या टप्प्यात आठ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ५७ मतदारसंघांसाठी येत्या एक जूनला मतदान होणार आहे.

**<><><><><>**

राज्यात विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या होणार असलेल्या निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने काल दोन उमेदवारांची घोषणा केली. मुंबई पदवीधर मतदारसंघातून अनिल परब आणि मुंबई शिक्षक मतदारसंघातून जे. एम. अभ्यंकर यांना पक्षानं उमेदवारी दिली आहे.

**<><><><><>**

देशभरात विविध दुर्घटनांमध्ये ४८ जणांचा मृत्यू झाला. **दिल्लीतल्या** विवेक विहार परिसरातल्या काल एका बाल रुग्णालयाला लागलेल्या आगीत ६ नवजात अर्भकांचा मृत्यू झाला, तर १२ बालकांची सुटका करण्यात आली. एक बाळ

आयसीयूमध्ये असून पाच बालकांवर अन्य रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

**गुजरातच्या** राजकोट इथल्या नाना मावा मार्गावर असलेल्या टीआरपी गेम झोनमध्ये लागलेल्या भीषण आगीत आतापर्यंत २७ जणांचा मृत्यू झाला. यात ९ लहान मुलांचा समावेश आहे.

**उत्तरप्रदेशात** शाहजहानपूर इथं काल रात्री भाविकांना घेऊन जात असलेल्या बसचा अपघात होऊन, अकरा जणांचा मृत्यू झाला, तर दहा जण जखमी झाले.

**काश्मिरच्या** कुलगामा खोऱ्यात निपोरा इथं काल संध्याकाळी झालेल्या प्रवासी वाहन रस्त्यावर घसरून झालेल्या अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला.

या दुर्घटनांबद्दल राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

राज्य माध्यमिक - उच्च माध्यमिक मंडळातर्फे इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या दुपारी एक वाजता ऑनलाइन जाहीर होणार आहे. मंडळाच्या विविध संकेतस्थळांवर निकाल बघता येईल. गुणपडताळणीसह गुणपत्रिका छायाप्रतींसाठी २८ मे पासून ११ जूनपर्यंत संकेतस्थळावरच ऑनलाइन पद्धतीनं अर्ज सादर करता येईल.

**<><><><><>**

दिग्दर्शक पायल कापडीया यांच्या ऑल वुई इमॅजिन ऍज लाईट या चित्रपटानं कान चित्रपट महोत्सवात ग्रॅण्ड पिक्स हा प्रतिष्ठेचा पुरस्कार पटकावत इतिहास रचला. पायल यांचा चित्रपट गुरुवारी या महोत्सवात दाखवण्यात आला. गेल्या तीस

वर्षाच्या कान चित्रपट महोत्सवात मुख्य स्पर्धेत दाखल झालेला त्याचप्रमाणे कोणत्याही भारतीय महिला दिग्दर्शकाचा पहिलाच चित्रपट आहे.

<><><><>

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे पुरस्कार काल जाहीर झाले. व्यावसायिक नाटकांमध्ये नियम व अटी लागू या नाटकाला सर्वोकृष्ट नाटकाचा, याच नाटकासाठी चंद्रकांत कुलकर्णी यांना दिग्दर्शनाचा पुरस्कार जाहीर झाला. अभिनेता संकर्षण कराडेला सर्वोत्कृष्ट अभिनेता आणि लेखनाचा पुरस्कारही जाहीर झाला. सर्वोत्कृष्ट प्रायोगिक नाटकाचा पुरस्कार नवी मुंबईच्या शिव रणभूमी प्रशांत प्रतिष्ठान, या संस्थेच्या 'आय एम पुंगळ्या शारूक्या आगीमहूळ' या नाटकाला जाहीर झाला आहे.

<><><><>

प्राप्तिकर विभाग आज देशातल्या जवळपास २० ठिकाणी शोधमोहीम राबवत आहे. शोध मोहिमेअंतर्गत नाशिकमधल्या एका सराफा दुकानातही छापा घालण्यात आला. या छाप्यामध्ये २६ कोटी रुपयांची रोकड आणि ९० कोटी रुपयांच्या बेहिशोबी मालमत्तेचे दस्तऐवज जप्त करण्यात आले आहेत.

<><><><>

कोल्हापूरमधल्या पंचगंगा नदीत नव्यानं सांडपाणी मिसळणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश पुणे विभागीय आयुक्त सी. एल. पुलकुंडवार यांनी दिले आहेत. पंचगंगा नदी प्रदूषण रोखण्यासंदर्भात काल जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते.

<><><><><>

आयपीएल टीट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या १७व्या हंगामाच्या विजेतेपदासाठी आज कोलकत्ता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैद्राबाद यांच्यात लढत होणार आहे. चेन्नईच्या एम.ए. चिदंबरम स्टेडिअमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल.

<><><><><>

क्वालालंपूर इथं झालेल्या मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी. व्ही. सिंधू हिला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. चीनच्या वांग झी यी हिनं सिंधूवर १६-२१, २१-५, २१-१६ अशी मात करत विजेतेपद पटकावलं.

//<><><><><>//